# दुसरी वेळ वाहन जाहीर लिलाव सुचना

## सामान्य प्रशासन विभाग,जिल्हा परिषद, गोंदिया

वाहन लिलाव क्र.साप्रवि/जिपगो/का-16/ 690 /17 दिनांक 6 / 4 /2017

**विषय :- जिल्हा परिषद, गोंदियाचे निर्लेखीत जुन्या वाहनांचे जाहीर लिलावादवारे हर्रासी (विक्री) दुसरी वेळ करण्याबाबत.**

सर्व जनतेच्या माहीतीसाठी या सुचनेदवारे जाहीर करण्यात येते की, गोंदिया जिल्हा परिषदेच्या मालकीच्या तसेच ताब्यातील जुन्या व निरुपयोगी वाहनांची जाहीर रित्या हर्रासी (विक्री) दुसरी वेळ करावयाची असुन त्याच्या अटी व शर्ती कार्यालयीन वेळेत (सुटटीच्या दिवसाव्यतीरीक्त) सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, गोंदिया येथे पहावयास मिळतील तसेच हर्रासी(विक्री) करावयाची वाहने व माहीती खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | विभागाचे नांव | लिलावादवारे निकालात काढावायाचे वाहने | वाहन खरेदी वर्ष | कंपनी मेक | वाहन पहावयाचे ठिकाण | हर्रास (विक्री) दिनांक | वाहन पाहण्याकरीता भेटण्याचे व लिलाव करीता कार्यवाहीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 9 |
| 1 | सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, गोंदिया | एम.एच.35 डी-149 टाटा सुमो (डीझेल) | एप्रिल.2003 | महींन्द्रा अॅन्ड महींन्द्रा कंपनी प्रा.लि. | जिल्हा परिषदेचे प्रशासकीय इमारत सभागृह जवळ | | जिल्हा परिषद, गोंदिया आमगांव रोड, गोंदिया |
| 2 | | एम.एच.35डी-201 ॲम्बेसीडर कार(पेट्रोल) | मे.2005 | हिंदुस्थान मोटर्स प्रा.लि. | | | |
| 3 | | एम.एच.35डी-777 ॲम्बेसीडर कार(पेट्रोल) | फेबृ.2003 | | | | |
| 4 | | एम.एच.35डी-346 टाटा मांझा कार (पेट्रोल) | 7.6.2011 | टाटा मोटर्स प्रा.लि. | | | (लिलावाची वाहने जाहीरातीच्या दिनांकापासुन ते -------- रोजी सायंकाळी 5.00 वाजता पर्यंत पहावयास उपलब्ध राहील) |
| 5 | | एम.एच.35डी-351 टाटा मांझा कार (पेट्रोल) | 7.6.2011 | | | | |

सदर वाहनाची हर्रासी (विक्री) जिल्हा परिषद, गोंदियाचे सभागृहात दिनांक 20.04.2017 रोजी दुपारी 1.00 वाजता करण्यात येईल. उपरोक्त वाहने जिल्हा परिषदेचे आवारात दिनांक 07.04.2017 रोजी सकाळी 11.00 वाजता पासुन पहावयास मिळतील. तसेच वाहनांचे जाहीर हर्रासी (विक्री) बाबत अटी व शर्ती जिल्हा परिषदेचे संकेतस्थळ www.zpgondia.gov.in वर उपलब्ध आहे.

6.4.17

सादरकर्ता क.प्र.अ. स.प्र.अ. उपमुकाअ(सा)

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, गोंदिया

## <u>वाहन जाहीर लिलावाच्या अटी व शर्ती</u>

1) इच्छुक बोलिदारांना लिलावात काढलेले साहीत्य व वाहने लिलावापुर्वी जाहीरातीच्या दिनांकापासुन 8 दिवसापर्यंत पहावयास मिळतील.
2) वाहने आहेत त्या स्थितीत पहावयास मिळतिल व त्याच स्थितीत ताब्यात घ्यावा लागेल.
3) कोणत्याही मंजुर लिलाव बोलीधारकांच्या लिलाव कोणत्याही कारणाशिवाय स्विकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अधिकार वाहन लिलाव समितीस राहील व वाहन लिलाव समितीने घेतलेला निर्णय हा अंतीम निर्णय राहील.
4) वाहन लिलावात बोली बोलण्याकरीता तसेच वाहन लिलावात भाग घेण्याकरीता **<u>रु.2000/-</u>** ची लिलाव फी व अनामत रक्कम **<u>रु.5000/-</u>** असे **एकुण रु.7,000/-** दिनांक 07.04.2017 ते दिनांक 20.04.2017 रोजी 11.00 वाजता पर्यंत सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, गोंदिया येथे जमा करावी लागेल व त्याशिवाय वाहन लिलावात बोली बोलता येणार नाही.
5) ज्याची लिलाव स्विकारण्यात येईल त्यांनी त्याच दिवशी वाहन खरेदीच्या 25% रक्कम रोखीने त्वरीत भरावे लागेल ती न भरल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व सदर लिलाव रदद करण्यात येउुन मालाचा किंवा वाहनाचा पुन्हा जाहीर लिलाव करण्यात येईल.
6) लिलाव कायम केल्याबद्दल बोलीदारास कळविण्यात आल्यापासुन 10 दिवसाचे आत त्याने उर्वरीत रक्कमेचा भरणा करणे आवश्यक आहे. उर्वरीत रक्कम ठरवुन दिलेल्या 10 दिवसाच्या मुदतीत न भरल्यास 13 % दराने व्याज आकारण्यात येईल.त्यानंतरही सदर रक्कम 15 दिवसाचे आत न भरल्यास अनामत रक्कम व वाहन खरेदी करीता भरलेली 25 % रक्कम व ईतर जमा केलेली रक्कम जप्त करण्यात येईल व व विक्री रद्द करुन सदर वाहनाचा पुन्हा लिलाव करण्यात येईल.
7) लिलाव धारकाने पुर्ण रक्कमेचा भरणा केल्यावर संबंधित साहीत्य / वाहन ...................... 15 दिवसाचे आत कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत ताब्यात घ्यावे तदनंतर प्रतिदिन 100/- (रुपये शंभर फक्त) दंड आकारण्यात येईल. 30 दिवसाचे आत माल ताब्यात न घेतल्यास समितीला लिलाव रद्द करण्याचा अधिकार राहील.संबंधित लिलाव खरेदीदाराची अनामत रक्कम व 90 दिवसाची दंडाची रक्कम वसुल करुन उर्वरीत रक्कम परत करण्यात येईल. याबाबत लिलावधारकास न्यायालयात किंवा इतर ठिकाणी दाद मागता येणार नाही..
8) लिलाव खरेदीदाराने माल ताब्यात घेतांना जिल्हा परिषदेच्या/ इमारतीचे / मालमत्तेचे नुकसान झाल्यास खरेदीदाराला झालेल्या नुकसानीबाबत जबाबदार धरण्यात येउुन नुकसान भरपाई वसुल करण्यात येईल.
9) यशस्वी लिलाव बोलीधारकाला विकत घेतलेले साहीत्याचे खरेदीच्या रक्कमेवर नियमानुसार विक्रीकर, व्हॅट ,व इतर सर्व प्रकारचे कर व शुल्क भरणे आवश्यक राहील. कोणतेही सुट मिळण्याचे प्रमाणपत्र लिलाव खरेदीदाराला मिळणार नाही.
10) लिलाव जाहीर केलेल्या मालाचा / साहीत्याचा लिलाव कोणतही कारण न देता वेळेवर स्थगित करण्याचा अधिकार वाहन लिलाव समितीस तथा मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.गोंदिया यांचे कडे राखुन ठेवण्यात आले आहे याबाबत कोणतीही तक्रार ऐकली जाणा नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.
11) यशस्वी लिलाव बोलीधारकांची रक्कम सोडुन इतर लिलाव बोलीधारकाची अनामत रक्कम रु.5000/- परत करण्यात येईल.

12) लिलाव जर शासनाने / समितीने ठरविलेल्या किंमान वाजवी किंमतीपेक्षा कमी येत असल्यास नव्याने जाहीर लिलाव करण्याचे अधिकार कोणतही कारण न देता वेळेवर स्थगित करण्याचा अधिकार वाहन लिलाव समितीस तथा मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.गोंदिया यांचे कडे राखुन ठेवण्यात आले आहे.याबाबत कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

13) वाहन घेतलेनंतर हस्तांतरण वैगरेचे सर्व कार्यवाही वाहन घेणाऱ्यास स्व खर्चाने करावी लागेल .

14) वाहनांचा ताबा दिल्यानंतर वाहनाची सर्वस्वी जबाबदारी खरेदीदाराची राहील व नंतर वाहनासंबंधी होणाऱ्या कोणत्याही विपरीत परिणामास ही जिल्हा परिषद जबाबदार राहणार नाही.

15) लिलावामध्ये शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना भाग घेता येणार नाही.

16) सदर वाहने निकामी व भंगार अवस्थेत लिलाव करावयाच्या असल्याने परिवहन खात्यात वाहने हस्तांतरीत करावयाची असल्यास खर्च व उचित प्रक्रीया ही खरेदीदारासच करावी लागेल.

17) सदरचे वाहन जिल्हा परिषद, गोंदियाचे प्रशासकीय इमारतीच्या परिसरात ,उपविभाग बांधकाम, गणेशनगर, गोंदिया व जिल्हा परिषदेचे कृषी भवन स्टेडीयम समोर कार्यालयाचे आवारात कार्यालयीन वेळेत पाहणीसाठी उपलब्ध आहे.

18) वाहन लिलावाच्या दिवशी बोलीदारांनी वाहनाची तपासणी केली आहे असे गृहीत धरण्यात येऊन नंतर वाहनाची कोणतीही तक्रार स्वीकारली जाणार नाही.

19) यशस्वी बोलीदाराकडुन 25 टक्के रक्कमेचा भरणा केल्यानंतर पुर्ण रक्कम भरेपर्यंत लिलावाच्या साहीत्याची जबाबदारी बोलीदाराची राहील व त्यास जिल्हा परिषद जबाबदार राहणार नाही.

20) संपुर्ण रक्कमेचा भरणा केल्यावर सहीत्य/ वाहने आहे त्या इकिाणावरुन आहे त्या स्थितीत तिन दिवसाचे आत (सुटीचे दिवसाव्यतीरीक्त) कार्यालयीन वेळेत नियमानुसार ताब्यात घ्यावा लागेल.

21) प्रत्येक वाहनाची हर्रासी वेगवेगळी करण्यात येईल. इतर गाडयांच्या हर्रासी सोबत सांगड घालता येणार नाही अथवा एका गाडीच्या हर्राशीचा दुसऱ्या गाडीच्या हर्राशीशी संबंध जोडता येणार नाही व त्या संबंधितबाब उपस्थित करता येणार नाही.

22) लिलावाच्या अटी व शर्ती पुर्ण न केल्यास अनामत रक्कम शासन खाती जमा करण्यात येईल.

सादरकर्ता    क.प्र.अ.    स.प्र.अ.    उपमुकाअ(सा)    मुख्य कार्यकारी अधिकारी

जिल्हा परिषद, गोंदिया